महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

जावक क्र.महाज्योती/नागपूर/ PhD/ २०२२/८३० दि.०२.११.२०२२

# परिपत्रक

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) – वर्ष २०२२-२३

## तात्पुरती निवड यादी घोषणा

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF) – वर्ष २०२२-२३ करिता दि.०१.०५.२०२२ ते दि.३०.०६.२०२२ पर्यंत जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात आलेले होते. निर्धारित केलेल्या जागांकरिता १५३९ अर्ज प्राप्त झालेले होते. प्राप्त झालेल्या अर्जाची व मूळ कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची तपासणी महाज्योती, नागपूर कार्यालयामार्फत दि.०१.०९.२०२२ ते दि.१५.०९.२०२२ या कालावधीत करण्यात आलेले आहे. त्यात एकूण १२२६ अर्ज पात्र ठरलेले आहेत.

**दि.०१.११.२०२२ रोजी झालेल्या महाज्योतीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सर्व पात्र उमेदवारांना दि.०१.११.२०२२ या मंजूर दिनांकापासून पात्र उमेदवारांना अधिछात्रवृत्ती (प्रथम दोन वर्षे रु.३१,०००/-+HRA व आकस्मिक खर्च, पुढील तीन वर्षे रु.३५,०००/-+HRA व आकस्मिक खर्च) देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे परिपत्रकासोबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीतील उमेदवारांची तात्पुरती निवड करण्याची घोषणा या द्वारे करण्यात येत आहे.**

ज्या उमेदवारांची तात्पुरती निवड झालेली आहे अश्या उमेदवारांनी महाज्योती, नागपूरच्या Ph.D. MIS मध्ये "Ph.D. अभ्यासक्रम सुरु असल्याबाबत प्रमाणपत्र" MIS मध्ये अपलोड करून प्रकल्प व्यवस्थापक (अधिछात्रवृत्ती विभाग) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२ या पत्त्यावर दि.२२.११.२०२२ पर्यंत रजिस्टर पोस्ट/स्पीड पोस्ट ने पाठवावे. जे उमेदवार विहित कालावधीत सदर प्रमाणपत्र सादर करू शकणार नाहीत अश्या उमेदवारांना अधिछात्रवृत्ती देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

उमेदवारांनी वर नमूद प्रमाणपत्र सादर केल्यावर या कार्यालयामार्फत पडताळणी करण्यात येईल. ज्या उमेदवारांचे वर नमूद प्रमाणपत्र योग्य आढळून येईल अश्या उमेदवारास MIS द्वारेच अधिछात्रवृत्ती प्रदान पत्र (Award Letter) download करता येईल. यादीबाबत काही आक्षेप असल्यास या कार्यालयाच्या mahajyotifellowship२०२२@gmail.com या मेल आय डी वर पुराव्यासहित सादर करावेत.

- स्वाक्षरीत -

व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर